सकाळ TODAY
गुरुवार, २७ ऑगस्ट २०२६

# कन्या महाविद्यालयात शैक्षणिक तपासणी

इचलकरंजी : श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाची शैक्षणिक व प्रशासकीय कार्य तपासणी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर येथील विद्या समितीच्या संस्थांतर्गत पथकाकडून केली. प्राचार्य डॉ. श्रुती जोशी यांनी प्राचार्य डॉ. एल. जी. जाधव, पथक सदस्य प्रा. डी. ए. पवार, प्रा. डॉ. ए. जी. सोनवले व वरिष्ठ लिपिक व्ही. पी. देसाई यांचे स्वागत केले. महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक सूचनाही समितीमार्फत दिल्या. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या प्रमुख प्रा. वर्षा पोतदार यांनी आभार मानले.